# वसई विरार शहर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दिनांक १४/१२/२०१६

## सकाळी ११.३० वा.

| अ. क्र. | विषयाचे नाव | मा. स्थायी समिती सभेचा निर्णय |
|---|---|---|
| १ | मागील मा. स्थायी समिती सभा दि. ०६/१२/२०१६ रोजीचे इतिवृत्त कायम करणे. | **ठराव :-** मागील मा. स्थायी समिती सभा दि. ०६/१२/२०१६ रोजीचे इतिवृत्त कायम करणेंत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. राजेंद्र कांबळी सूचक :- मा.श्री. चंद्रकांत गोरीवले** |
| २ | प्रभाग समिती जी मधील वॉर्ड नं. १०५ मध्ये जुचंद्र येथे स्मशानभुमीमध्ये दहन शेड, गोडावुन व इतर कामे करणेकामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत. | **ठराव :-** वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त नमुद कामी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यांत येत आहे. तसेच पुढील निविदा कार्यवाहीस मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.अजीत नाईक सूचक :- मा.श्री. चंद्रकांत गोरीवले** |
| ३ | प्रभाग समिती (ब) (एफ) पेल्हार क्षेत्रातील नालासोपारा पूर्व येथील संतोष भुवन नाका ते जि.प. शाळा मुख्य नाल्यापर्यंत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे कामी कमी दराच्या निविदाधारकाबरोबर संविदा करणेस मान्यता देणेबाबत. | **ठराव :-** सदर बाबत सांगोपन चर्चा होऊन उपरोक्त निविदांची तुलना करता मे. एस.एम.डेव्हलपर्स ह्यांची निविदा सर्वात कमी व वाजवी आहे. तरी महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस मा.आयुक्त ह्यांनी मंजूरी दिली आहे. याकामी संविदा करणेसाठी ही सभा म.न.पा.च्या वतीने कायदेशीर बाबींची पुर्तता करून मान्यता देत आहे व कामी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. किशोर पाटील सूचक :- मा.श्री. राजेंद्र कांबळी** |
| ४ | सन २०१६-२०१७-२०१८ या वित्तीय वर्षाकरीता प्रभाग समिती 'अे' विरार पश्चिम (तात्कालीन नगरपरिषद क्षेत्र) दैनंदिन व आठवडे बाजार वसुली शुल्क तरतुदी बाबत. | **ठराव :-** उपरोक्त प्रस्तावानुसार साधक-बाधक चर्चा करण्यांत आली व जाहीर निविदा मागविण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे. ई-निविदेची कार्यवाही पूर्ण होईपर्यंत मागील वर्षातील मंजूर निविदाकारास रक्कम रू. २५,१०८३५/- (अक्षरी पंचवीस लक्ष दहा हजार आठशे पस्तीस रु.मात्र) या रक्कमेत १०% वाढ करून रक्कम रू. २५,३५,९४३/- (अक्षरी पंचवीस लक्ष पस्तीस हजार नवशे त्रेचाळीस रु मात्र) या रक्कमेवर १५% सेवाकर आकारून रक्कम निश्चित करून निविदा प्रक्रिया करणेंस मंजूरी देण्यांत येत आहे. तसेच याबाबत वर्तमानपत्रात प्रसिध्दी खर्चास व त्या अनुषंगाने येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. राजेंद्र कांबळी सूचक :- मा.श्री. चंद्रकांत गोरीवले** |